# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

दिनांक 09/07/2021 (शुक्रवार)

(दुपार)

---

### चोरी

पो.स्टे. केळवद :– अंतर्गत 10 कि. मी. अंतरावर पिपळा भदी येथे दि. 01/07/2021 चे 18.00 वा. ते दि. 06/07/2021 चे 10.00 वा. चे सुमारास फिर्यादी नामे– मधुकर विठठोबाजी पन्नाते, रा. सटवामाता मंदिर सावनेर याने मौजा पिपळा भदी शिवारातील डॉ. अनूप जैस्वाल यांचे नावाने असलेली 3/2 एक्कर शेतीची वयवाट करतात. फिर्यादी हा दिनांक 01/07/2021 रोजी 18.00 वा दरम्यान शेतातील सामान रुममध्ये ठेवुन घराकडे गेला असता व 06/07/2021 रोजी 10.00 वा शेतात गेला असता शेतातील 1) टेक्ने कंपनीची पाण्याची मोटार कि. 7000/–रु 2) जुन्या 02 मोटारी कि .6000/–रु 3) 02 नग फवारनी यंत्र कि. 7000/–रु 4)200 फुट वायर कि.2000/–रु 5) 30 फुट प्लासटीक पाइप कि. 400/–रु., 6) इतर शेती उपयोगी सामान कि. 700/–रु असा एकुण कि. 23,100/–रु चा माल अज्ञात आरोपीने रुमची मागील खीडकी तोडुन रुममध्ये प्रवेश करुन सदर माल चोरुन नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. केळवद येथ आरोपीविरुध्द कलम 457, 380 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोहवा रामराव पवार मो.क्र. 9823074742 हे करीत आहे.

### दुखापत

पो.स्टे. कोंढाळी :– अंतर्गत 4 कि. मी अंतरावर मौजा नांदोरा येथे दिनांक 08/07/2021 चे 00:30 वा. दरम्यान आरोपी नामे– 1) अमोल कंगाली, 2) शरद रामरावजी ढवळे व 3) आशिष ज्ञानेश्वर तिडंगाम तिन्ही रा. नांदोरा ता. काटोल जि.नागपूर यांनी संगनमत करून जुन्या झगडयाच्या कारणावरून वाद विवाद करून फिर्यादी नामे– मंगेश वसंत उईके, वय 29 वर्ष, रा. नांदोरा यांच्या घराच्या अंगनात "तु कसा काय आला" असे म्हणुन तिघांनी हातबुक्कीने व लाकडी दांडयाने मारून फिर्यादीला दोन्ही हात बांधुन काही अंतरा पर्यंत सिमेंट रोडने घासत नेवुन चौकातील हॅडपंपला दोरीने बांधुन ठेवुन जखमी केले. त्यामुळे फिर्यादीची पाठ व पासोडया तसेच उजव्या पायाच्या टोंगळयाला मार लागला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. कोंढाळी येथे आरोपीविरुध्द कलम 324, 342, 34 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. यातील आरोपीतांचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोहवा भोजराज तांदुळकर मो.नं. 9922314442 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर